Thanks to the Internet, the world is now wider, and closer than ever. But the Frankensteins it has unleashed on the world, in the form of social media misinformation, easy access to hate speech, pornography, the so-called Dark Web where shady deals lurk and similar misadventures, are still a concern and the community of digital entrepreneurs, scientists and activists must fume their brains further to take the Internet out of the bad web it has now found itself in.

*A weekly column that helps you ask the right questions*

Business Line : 31/10/2019





Image Courtesy: Google Images

Miscellaneous

# ऐकण्या-पाहण्याचा दस्तावेज

सुरेश चांदवणकर
samwad.mt@gmail.com

**आजच्या जागतिक 'दृक-श्राव्य वारसा दिना'च्या निमित्ताने या दिवसाचं महत्त्व आणि भारतात त्याचं कार्य कसं सुरू आहे, तत्संबंधीचा घेतलेला मागोवा...**





२७ ऑक्टोबर हा दिवस दृक-श्राव्य'वारसा दिन म्हणून साजरा करावा असं युनेस्कोनं २००५ साली जाहीर केलं. त्यानुसार ऑडिओ, व्हिडीओ, फिल्म्स, रेडिओ व टी.व्ही. प्रोग्रॅम्स हे सगळं दस्तावेजच (Documents) असून ग्रंथांप्रमाणे त्यांचंही जतन व संरक्षण केलं पााहिजे, हे आता जगभरात मान्य झालेलं आहे. असा दिवस साजरा करून वर्षातून एकदा तरी समाजात व संबंधितांत ह्या अनमोल वारशाची आठवण जागवावी, आपापल्या कर्तव्याची जाणीव करून द्यावी व नव्या पिढीला यात जोडून घ्यावं, अशी त्यामागे कल्पना आहे. इंटरनेटवर शोध घेतला असता असा दिवस आपल्या देशात कुठं साजरा होतोय, असं सापडत नाही. हा वारसा आहे तरी काय आणि कुठे सापडू शकेल याचा हा शोध?

ऑडिओमध्ये १८७७च्या एडिसनच्या बांगडी (सिलिंडर) पासून सुरूवात होते. आवाज कायमचा बंद करून ठेवायची व हवा तेव्हा तो पुन्हा ऐकायची मोठी सोय त्यामुळं झाली. ध्वनिमुद्रिका, कॅसेट टेप्स, कॉम्पॅक्ट डिस्कस् व आता मोबाइल फोनमध्ये हा सारा ऐवज ऐकायला मिळतो. असे सुमारे तीन लाख दस्तावेज आहेत हे. हा ठेवा व वारसा जतन करून ठेवण्याच्या कामात शेकडो संग्राहक व काही संस्था गेली अनेक वर्षं काम करत आहेत. १९८५च्या सुमारास डिजिटल युग सुरू झालं, तेव्हा जुनी गाणी नव्या माध्यमातून विकणं ग्रामोफोन कंपनीला भागच होतं. ती गाणी संग्राहकांमुळेच कंपनीला मिळू शकली. तेव्हा कुठे कंपनीला ह्या वारशाची जाणीव झाली व नवीन उत्पादनांच्या काही प्रती तरी कायम स्वरूपात स्वतःच्या संग्रहालयात साठवायला सुरुवात झाली. आज त्या साठवणुकीची स्थिती ग्रामोफोन कंपनीत काय आहे हे कळू शकत नाही. टेप तर इतिहासजमा झाल्याच, पण सीडी उत्पादनसुद्धा बंद होण्याच्या मार्गावर आहे. सोशल मीडियाच्या रेट्यापुढं सगळ्याच ऑडिओ कंपन्या मेटाकुटीला येत आहेत व बंद पडणार आहेत हे नक्की!

अशा वेळी वैयक्तिक संग्रह व संग्रहालयं ही वारसा जपणुकीची महत्त्वाची ठिकाणं ठरतात. 'सोसायटी ऑफ इंडियन रेकॉर्ड कलेक्टर्स'चे शंभराहून अधिक सभासद गेली तीस वर्षं हे काम अतिशय तळमळीनं करत आहेत. सनी मॅथ्यू यांनी तर केरळमध्ये कोट्टायम जवळ 'डिस्कस् व मशीन्स' हे स्वतःचं म्युझियमच उभं केलं असून तिथं दरवर्षी संग्राहक व रसिकांचा मेळावा आयोजित केला जातो. हा उपक्रम गेली पाच वर्षं चालू आहे. सोलापूर येथे सार्वजनिक वाचनालयात ग्रंथांबरोबर रेकॉर्ड्सना पण जागा उपलब्ध करून देण्यात आली असून, गेली दहा वर्षं हे काम चालू आहे. बंगलोर शहरात 'इंडियन म्युझिक एक्सपीरियन्स' नावाचं इंटरॅक्टिव्ह वस्तुसंग्रहालय उभं राहिलं असून पर्यटकांचं आकर्षण बिंदू ठरत आहे. कोलकाता येथे जादवपूर विद्यापीठात ध्वनिमुद्रित संगीत मोठ्या प्रमाणावर साठवून ठेवलेलं आहे. दिल्लीमध्ये 'अमेरिकन इन्स्टिटयूट ऑफ इंडियन स्टडिज' ह्या संस्थेत मोठा खजिना जतन केलेला आहे.

१९२५ च्या आसपास ब्रिटिशांच्या काळात रेडियो व ब्रॉडकास्टिंगची सुरुवात झाली. स्वतंत्र भारतात 'ऑल इंडिया रेडिओ' म्हणजे आकाशवाणीचं शेकडो केंद्रांचं जाळं उभं राहिलं. १९७०च्या आसपास टेलिव्हिजन घरोघरी पोचायला सुरूवात झाली. पुढे उपग्रह वाहिन्यांचं जाळं तयार झालं. १९९७ मध्ये रेडिओ व टेलिव्हिजन यांचं एकत्रीकरण होऊन प्रसार भारतीची स्थापना झाली. ह्या सर्वच ठिकाणी दर क्षणाला प्रसारण चालू असतं व पुढच्याच क्षणाला ते 'वारसा' म्हणून इतिहासात जमा देखील होत असतं. त्या वारशाचं पुढं काय होतं, हा सामान्यांना नेहमी पडणारा प्रश्न. उलट 'अमुक कार्यक्रम नष्ट झाला', 'टेपचं दुर्भिक्ष असल्यानं मौल्यवान कार्यक्रम पुसून टाकून नवं मुद्रित केलं' अशा सारख्या बातम्या अधूनमधून वाचनात येतात. अशा वेळी साहजिकच ह्या अनास्थेची चीड येते.

२०१२ च्या सुमारास प्रसार भारतीनं जो काही वारसा शिल्लक उरला आहे, त्याचं जतन करायचा निर्णय घेतला. त्यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभारली. आता त्याला चांगलं स्वरूप आलेलं आहे. प्रसार भारतीच्या संकेतस्थळावर ही सगळी माहिती उपलब्ध आहे. सीडी व डीव्हीडीवर वारसा सांगणारे अनेक कार्यक्रम उपलब्ध आहेत आणि आधुनिक तंत्रात ऑन लाइन देण्याचेही प्रयत्न चालू आहेत.

रेडिओ व टी.व्ही.प्रमाणेच जुना हा सिनेमाचा इतिहास आहे. थॉमस अल्वा एडिसन यांचीच ही पण एक अमोल देणगी. मूकपट ते डिजिटल युगापर्यंतचा हा ठेवा अमोल व वारसा अफाट. मात्र 'राजकमल चित्र मंदिर'सारखे काही मोजके अपवाद वगळता इंडस्ट्रीमध्ये जपणुकीचे फारसे प्रयत्न दिसत नाहीत. १९६४ मध्ये पी. के. नायर ह्यांच्या तळमळीतनं 'पुणे फिल्म अर्काइव्ह'ची कल्पना प्रत्यक्षात आली. तिथंही अली भारइंसारख्या संग्राहकांची मोठी मदत झाली. आधी पुण्याच्या 'फिल्म व टेलीव्हिजन इन्स्टिटयूट'मध्ये साठवणीला सुरूवात झाली व पुढं जवळच्या स्वतंत्र जागेत हा सगळा पसारा हलवण्यात आला. संस्था सरकारी झाल्यानं बेफिकीरी आली व वाचवलेल्या वारशापेक्षा जपलेल्या फिल्म रीळांच्या बातम्या महत्त्वाच्या होऊन एक प्रकारची उदासीनता काही काळ दाटून आली. पण २०१०च्या सुमारास विजय जाधव, मग प्रशांत पाठराबे व आता प्रकाश मगदूम ह्यांच्यासारखे संचालक लाभल्यानं काही अभिमान वाटावा असं काम झालं आहे व होत आहे. ते प्रत्यक्ष जागेवर जाऊन किंवा संकेत स्थळावर जाऊन बघावं, असंच आहे. शेवटी सर्वोच्च जागी बसलेल्याची तळमळ, वकूब व मिळणारं स्वातंत्र्य हे महत्त्वाचं व हा जगभराचा अनुभव आहे.

२०१० नंतर मोबाइल मुळं ही सगळीच माध्यमं आता जवळपास प्रत्येकाच्या मुठीत आली आहेत. मोबाइलच्या घटत जाणाऱ्या किंमती, वाढत जाणारी साठवण क्षमता व वेगवान संदेशवहन यामुळं प्रत्येक जण ह्या वारशाचा पाइक झालेला आहे, पण त्याची आपल्याला जाणीव नाही. दुसरीकडे सोशल मीडिया, गुगल, गाना डॉट कॉम व स्पॉटीफाय, यू-टयूब यांसारख्या कंपन्या व क्लाउड सोर्सिंग सारखं तंत्रज्ञान यामुळं २७ ऑक्टोबरसारखा वारसा दिन रोजच साजरा होतो आहे. ऐकायला व पाहायला पुरुन उरेल एवढं खिशात आहे. ते काय आहे, त्याचं महत्त्व सांगायची वेळ आता आली आहे. म्हणूनच की काय ह्या वर्षीची २७ ऑक्टोबरला युनेस्कोनं जाहीर केलेली वर्षभराची थीम आहे- Engage the Past Through Sound and Images!

संवाद




## मेंदूशी मैत्री

# असं चालतं वाचन...



**वाचन करताना** डोळ्यांना जी अक्षरं दिसतात, ती मेंदूतील 'टेम्पोरल लोब'मध्ये पाठवली जातात. इथे दोन अक्षरांमधला फरक ओळखण्याचं काम चालतं. 'च' आणि 'ज' यांच्यातला फरक, 'प' आणि 'ष' यांच्यातला फरक समजला नाही, तर अर्थाचा अनर्थ होतो. शब्दच ओळखला गेला नाही, तर अर्थ लावण्यात चूक होते.

शब्द ऐकू आला किंवा वाचला, की लगेच त्या शब्दाचं एक चित्र मेंदूच्या याच भागात तयार होतं. 'नदी' असं ऐकलं किंवा वाचलं, की नदीचं चित्र डोळ्यांसमोर उभं राहतं. हे काम काही मिलिसेकंदांमध्ये होत असतं; त्यामुळे आपल्याला ते जाणवत नाही.

ज्या मुलांना वाचन करताना समस्या जाणवतात, त्यांना कदाचित या पहिल्या पायरीवरच अडथळा जाणवत असेल. चित्र उभं राहिलं नाही, तर मुलं वाचू शकणार नाहीत आणि अर्थ लक्षात येणार नाही.

ही गोष्ट लक्षात घेतली, तर ज्या गोष्टी मुलांनी कधी अनुभवल्या नाहीत, चित्रात पाहिल्या नाहीत, त्या नजरेसमोर आणणं मुलांना सुरुवातीला अवघड जातं. उदा. आदिवासी भागातल्या मुलाला मुंबईचं धकाधकीचं जीवन वर्णन करून सांगितलं, तर नजरेसमोर येईल, पण त्यातली दगदग अनुभवावीच लागेल. तर आदिवासी भागात मुंबईतल्या मुलाला सहजपणे डोंगर चढणं, झाडावर चढणं हे जमणार नाही. शिक्षण अनुभवजन्य असावं असं म्हणतात, ते यासाठी!

'फ्रण्टल लोब' हा भाग मेंदूच्या डाव्या आणि उजव्या क्षेत्रात विभागून आहे. हालचाल, समस्या सोडवणं, स्मरणशक्ती, योजना आखणं, निर्णय घेणं ही या भागाची मुख्य कार्यं आहेत. फ्रण्टल लोबच्या डाव्या भागात बोलणं, सलग वाचन करणं, व्याकरणाचा उपयोग करणं आणि अर्थ लावणं ही महत्त्वाची कामं होतात.

मेंदूच्या अंतर्भागात टेम्पोरल लोबमध्ये 'अँग्युलर गायरस' हा भाग आहे. ऐकण्यातून किंवा वाचनातून मिळालेली माहिती जमवून त्यावर संस्करण करण्याचं काम इथं चालतं.

वाचनाला मदत करणारे हे भाग एकमेकांशी जुळवून घेऊन काम करतात. यातल्या एक भागासाठी काम केलं, तर इतर भागांची क्षमता वाढते असं दिसून आलं आहे. हे वाक्य उलट करायचं, तर एकाही भागासाठी काम केलं नाही, तर संपूर्ण वाचन क्षमतेवरच परिणाम होतो.

- डॉ. श्रुती पानसे
contact@shrutipanse.com

लोकसत्ता Mon, 07 October 2019
https://epaper.loksatta.com/c/44420899



# मिथकांचा लेखक आणि लेखकीय मिथक

गजानन अपिने

१

म्हैसूर जिल्ह्यामधील नंजनगुंड तालुक्यातील देवनूरू ह्या छोट्याशा खेड्यात १९४८ मध्ये देवनूर महादेव यांचा जन्म झाला. देवनूर हे स्वतंत्र भारतात जन्मलेल्या पहिल्या पिढीचे प्रतिनिधी आहेत. विद्यार्थीदशेतच देवनूर महादेव यांनी *कत्तल तिरुवू* (१९६७) नावाची कथा खुद्द पोलीस लॉकअप लिहिली. देवनूर यांचे वडील हे पोलीस कॉन्स्टेबल होते. विद्यार्थी दशेत देवनूर यांनी तन्मयतेने जोपासलेल्या वाचण्या-लिहिण्याच्या सवयीमुळे बारावीमध्ये नापास झाल्याच्या कारणाने वडिलांनी अभ्यासाच्या पुस्तकांसह त्यांना पोलीस लॉकअप मध्ये ठेवले होते. त्यावेळी लॉकअपमध्येच त्यांनी आपली पहिली वहिली कथा लिहिली. अर्थात देवनूर यांची पहिली कथा पोलिस लॉकअप मध्ये जन्मली. त्यानंतर देवनूर गेली चाळीस-पंचेचाळीस वर्षे सतत लिहिते राहिलेले आहेत. मात्र इतक्या प्रदीर्घ लेखकीय कालखंडात *द्यावनुरू* (१९७३), *वडलाळा* (१९७९) आणि *कुसुमबाला* (१९८४) अशा केवळ तीनच कथनात्म संहिता त्यांच्या नावावर आहेत. मागील काही वर्षांमध्ये विविधप्रसंगी केलेली भाषणे आणि संदर्भानुसार लिहिलेल्या निबंधांचा *यदेगे बिद्द अक्षरा* (२०१२) या नावाने संग्रह प्रसिद्ध झालेला आहे. अलीकडील काही भाषणे आणि लिहिलेल्या निबंधांचा दोनेकशे पानांचा मजकूर चालू वर्षी प्रसिद्ध होतो आहे. *यदेगे बिद्द अक्षरा* मध्ये एकूण ऐंशी निबंध आहेत. त्यातील एकेका निबंधांचा व्याप हा साधारण दोन-तीन पानांच्या आतबाहेरच आहे. मात्र त्यातील तगडा आशयव्यवहार हा थक्क करणारा आणि स्वतंत्र मर्मदृष्टींनी व्यापलेला आहे. हा एक असा दुर्मीळ लेखक आहे जो आपल्या मोजक्याच संहितांनी साहित्यव्यवहाराचा खूप मोठा अवकाश व्यापलेला आहे. कन्नड साहित्यव्यवहारात देवनूर यांच्या साहित्याची आणि त्यांच्या लेखकीय व्यक्तिमत्त्वाची चर्चा गेल्या चाळीस-पंचेचाळीस वर्षात अजूनही जोमदारपणे टिकून आहे. कर्नाटक मध्ये ह्या लेखकाची ओळख ही गंभीर लिहिणारा आणि त्याचवेळी खूपविक्या लेखक अशा दोन्ही पद्धतीची आहे. नव्या पिढीतील तरुण लेखक आणि कार्यकर्त्यांमध्ये देवनूर सन्मानित बुद्धिजीवी आणि आणि एक प्रेरणादायी, तत्त्वनिष्ठ व्यक्मितत्त्व म्हणून प्रसिद्ध आहेत.

कर्नाटकात देवनूर यांची प्रतिमा ही एकीकडे अत्यंत 'चोखंदळ लिहिता लेखक' आणि दुसरीकडे 'पब्लिक इंटलेक्च्युअल' अशा दुहेरी स्वरूपाची आहे. दलित आणि शेतकरी ह्या दोन्हींना केंद्रस्थानी ठेवून एकत्रित विकसित केलेली *सर्वोदय कर्नाटक* ह्या राजकीय पक्षाची बांधणी आणि ह्या पक्षाचे पहिले अध्यक्ष म्हणून देखील त्यांनी स्थान भूषविलेले आहे. हा पक्ष आजतागायत कर्नाटक राज्याच्या एकूण राजकीय व्यवहारात मूल्यगर्भ हस्तक्षेप करत आलेला आहे. एकाचवेळी अनेक पैलूंनी युक्त असा हा लेखक एकाचवेळी अन्यायाविरोधात उभा राहणारा, प्रखर संवेदनशीलता जपणारा, मूल्ययुक्त राजकारणात सक्रीय असणारा, वास्तवाची ठळक किनार पकडणारा, परंपरेला अत्यंत सूक्ष्म आणि चिकित्सकपणे आपल्या लेखनद्रव्यात मुरवणारा म्हणून अधिक लक्षणीय आणि अर्थपूर्ण वाटतो. एका लिहित्या लेखकामध्ये व्यक्तिमत्त्वाचे इतके पैलू क्वचितच एकत्रित असतात. यामुळेच त्यांना *कलकत्ता भारतीय भाषा परिषद प्रशस्ती* (१९८४), *साहित्य अकादमी* (१९९०), *कर्नाटक साहित्य अकादमी* (१९९५), *पद्मश्री* (२०११) आदी महत्त्वपूर्ण पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. एकीकडे असे चित्र असताना देवनूर यांनी सरकार आणि प्रस्थापित समाज-समूहाच्या विरोधात वेळोवेळी कठोर भूमिका घेतलेली आहे. लेखकांचा प्रतिनिधी

म्हणून राखीव जागेतून सरकारने देऊ केलेली राज्यसभेची खासदारकी त्यांनी नाकारली. पाच लाख रूपयांचा कर्नाटक सरकारचा नृपतुंगा पुरस्कार नाकारला. कर्नाटक राज्योत्सव पुरस्कार नाकारला. मागील दोन वर्षात देशातील सामाजिक न्याय, सहिष्णुता, अभिव्यक्ती स्वातंत्र्य ह्याविरोधात उभे केले जात असलेले वातावरण आणि यावर सरकारने पाळलेले सोयीस्कर मौन याचा निषेध म्हणून देवनूर महादेव यांनी आपला *पद्मश्री* आणि *साहित्य अकादमी* हे दोन पुरस्कार परत केले.

२

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील साठ, सत्तरच्या दशकात संपूर्ण भारतभरातील अनेक प्रादेशिक भाषांमध्ये एकाच वेळी सकस लेखन होत असताना आपल्याला दिसते. यातील अनेकांचे लेखन राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर अधोरेखित झाले आहे. या मधील अनेकांच्या साहित्यकृती ह्या भारतातील विविध प्रादेशिक भाषांमध्ये, किंबहुना इंग्रजी, जर्मन, फ्रेंच आदी भाषांतून अनुवादित झाल्या. इतकेच नव्हे तर त्यांच्या लेखनातील क्षमतेमुळेच भारतात किंबहुना जगभरातील अनेक विद्यापीठांमधून त्यांचे साहित्य आजही अभ्यासले जात आहे. या काळातील अनेक लिहित्या लेखकांनी अपारंपरिक असे सर्जनशील लेखन केले. (अर्थातच ऐंशी, नव्वदच्या दशकात त्यातूनच काही बऱ्या तर काही सुमार लेखन परंपरा गतिमान झाल्याचे चित्र लपत नाही.) ही मंडळी एकीकडे जगभरातील उत्तमोत्तम साहित्यकृती आणि दर्शनव्यवहाराला जोडून घेताना आपल्या परंपरा आणि वर्तमानाला तितक्याच सूक्ष्मपणे उलगडण्याचा प्रयत्न करत होती. आपापल्या मातृभाषेतून लिहिणे सन्मानाचे आणि जबाबदारीचे मानत होती. त्यांनी आपल्या सर्जनशील लेखणीने विविधांगी आणि खोल जीवनानुभव उजागर करतानाच विविध साहित्यप्रकार देखील गतिमान केले आहेत. अशा लेखकांमध्ये सत्तरच्या दशकात कन्नडमधून लिहित्या झालेल्या देवनूर महादेव यांचा क्रम वरती लागतो.

स्वतंत्र भारतात लिहू लागलेल्या काही लेखकांबद्दल एक महत्त्वपूर्ण गोष्टीची नोंद या निमित्ताने घ्यावी लागेल ती ही की, येथील त्यांच्यापैकी अनेकांवर राम मनोहर लोहिया आणि ते मांडू पहात असलेल्या विचारांचा खूप मोठा प्रभाव होता. परिणामी यातील अनेकजण जाहीरपणे आपल्या स्वतःचा उल्लेख लोहियावादी असे करायचे. भारताच्या विविध राज्यात असे मातब्बर लेखक आपल्याला दिसतील की, जे स्वतःला लोहियावादी म्हणवून घेत होते. कर्नाटकातील अशा मंडळींमध्ये यू.आर. अनंतमूर्ती आणि देवनूर महादेव यांचा यात सहजपणे उल्लेख करता येईल. याबाबत स्वतः अनंतमूर्ती आणि देवनूर यांनीही याची जाहीरपणे वाच्यता केलेली आहे. एकीकडे प्रभावी लेखक आणि दुसरीकडे चळवळीतील सक्रिय कार्यकर्ता ह्या दोन्ही पातळ्यांवर ते आघाडीवर असल्याचे दिसून येते. म्हैसूर मध्ये जयप्रकाश नारायण यांच्या एका जाहीर भाषणाचे अध्यक्ष तरुण देवनूर महादेव होते. ही बाबही अनेक गोष्टी स्पष्ट करून जाते. एकूणच बसवेश्वर, फुले, आंबेडकर, लोहिया, नारायणगुरू, पेरियार अशांनी विकसित केलेल्या प्रखर चळवळीच्या परंपरेला आपल्या लेखणीच्या साहाय्याने दृग्गोचर करणारा एक महत्त्वपूर्ण लेखक म्हणून कन्नड साहित्यामध्ये महादेव देवनूर मोठ्या प्रमाणात वाचला जातो. आजही लेखणी आणि जगण्यातील बंडखोरीला जराही मुरड न घालता देखील त्यांना लेखक म्हणून मिळालेली प्रशस्ती पाहू जाता हा एक दुर्मीळ मेळ आहे, असेच म्हणावे लागेल.

३

आपल्या संपूर्ण लेखकीय कारकिर्दीमध्ये देवनूर यांनी आपली स्वतःची स्वतंत्र लेखनपरंपरा निर्माण केली. त्यांच्या लिहित्या काळात आत्मकेंद्रित, व्यक्तिवादी लेखनाचे स्वरूप संपूर्ण भारतात जेव्हा मूळ धरत होते, त्याकाळात देवनूर समाज-

समूहकेंद्री लिहीत होते. आत्मकेंद्रिततेहून, व्यक्तिवादी मांडणीपेक्षाही सभोवतालच्या लोकांच्या गोष्टी त्यांच्या लेखनमुळाशी येऊ लागल्या होत्या. आपल्याच आजूबाजूला पसरलेल्या आणि स्वतंत्र भारतात देखील अस्पृश्यांचे जिणे जगणाऱ्या माणसांच्या गोष्टी त्यांच्या लेखनद्रव्यात आहेत. याच माध्यमातून समाजव्यवहारातील विसंगती, शोषण, अन्यायी जागा हेरून आपल्या लेखनसामर्थ्याने देवनूर यांनी त्याला कलारूप देत समकालीन जातिव्यवस्था आणि जाती अंतर्गत असणाऱ्या पुरुषसत्ताक व्यवस्थांचा विद्रूप चेहरा जगासमोर आणला. यातून देवनूर यांनी *कुसुमबाला* ही बहुचर्चित आणि महाकाव्याचे अंश स्वतःमध्ये साठवून असलेली कादंबरी लिहिली. एकूण चार पिढ्यांचे चित्रण ह्या कादंबरीत आहे. अक्कमहादेवी, बसाप्पास्वामी, सिद्धू, याडा, सोमप्पा, कुसुम, चन्ना, तुरम्मा, केंपी, ईरी अशी अनेक आरपार भेदत जाणारी पात्रं आपापल्या जगण्याची वेडीवाकडी रचना घेऊन कादंबरीतून उतरत राहतात. खरंतर समाजातील अनेक सोकॉल्ड व्यवस्था माणसांच्या जगण्याची रचना बिघडवत असतात. ही कादंबरी त्या बिघडलेल्या रचनांच्या माणसांची गोष्ट व्हायला लागते.

या कादंबरीतील अक्कमहादेवी ही नवरा मेल्यानंतर तेराव्याच्या दुसऱ्याच दिवशी माहेरी गेलेली. बाप मेल्यावर बारा महिन्याने आपल्याच घरच्या सालगड्यापासून जन्माला आलाय असा आळ असलेल्या आपल्या पोराला म्हणजे याडाला घेऊन अक्कमहादेवी सहा वर्षानंतर आपल्या नवऱ्याची वाटणी मागण्यासाठी सासरी आलेली आहे. तेव्हा तिचा मोठा दीर बसप्पास्वामी आणि धाकटा दीर सिद्धू तिला रागाने माळावर फेकतात. अक्कमहादेवी टाकून दिलेल्या जागीच खोपटं उभारते आणि आपल्या मुलासोबत राहू लागते. याडा मोठा होता होता त्याच्या कर्तृत्वाने त्या खोपट्याचं रूपांतर महालात होतं. ह्या याडेगौडाचा मुलगा सोमप्पा पुढे गावचा मोठा प्रतिष्ठित पुढारी बनतो. सोमप्पाची मुलगी कुसुम. उच्च मानल्या गेलेल्या जातीतील कुसुमचे चन्ना नावाच्या महार जातीतील मुलाशी प्रेमसंबंध आहेत. आणि हे प्रेमसंबंध कुसुमला जन्मलेल्या  चन्नासारख्या काळ्या रंगाच्या मुलाने उघडकीस येतात. यातून चन्नाची बिनभोबाट हत्या होते. कुणाला कशाचाच पत्ता लागत नाही. चन्नाचे आईवडील, भावकी चन्नाच्या परत येण्याची वाट पाहत असतात तर चन्नाच्या असण्यानसण्याच्या अनेक अफवा गावात पसरलेल्या असतात. अशा अर्थाच्या प्रमुख कथासूत्रातून कादंबरी वाढते आणि दरम्यान अत्यंत रूपकात्मक पद्धतीने अनेकांच्या अनेक गोष्टी आपल्यात

*कादंबरी* या साहित्यप्रकाराला आधुनिक महाकाव्याची उपमा का दिली जाते, याचे प्रत्यंतर प्रस्तुत कादंबरीच्या वाचनादरम्यान येऊ शकते. या कादंबरीत कादंबरीकार सर्वसामान्यपणे समाजव्यवहारात ज्या स्त्रियांना व्याभिचारी मानून हिणवले अथवा दुखावले जाते त्यांनाच अर्थात 'अक्कमहादेवी' आणि 'कुसुम' यांना कादंबरीचे नायिकापद देतो. आणि प्रत्यक्ष समाजव्यवहारातील जातिव्यवस्थेला आरपार छेदत त्यातील घाण उघडी पाडत जातो. सोबत समाजातील व्यवस्थांतर्गत लपलेल्या अनेक शोषणक्रियांना उलगडत जातो. *कुसुमबाला* च्या सूक्ष्मवाचनातून एक गोष्ट ध्यानात येते की, ही कादंबरी जातिसंघर्षाबद्दल बोलते. पण ती केवळ जातिसंघर्षापुरती शिल्लक राहत नाही. जातिसंघर्षाच्या निमित्ताने ही कादंबरी एकूण शोषणात, संघर्षात पिचल्या जाणाऱ्या अनेक स्तरातील लोकांना अधोरेखित करत राहते. त्यात मग अनेक जातीचे, वर्गाचे स्त्री-पुरुष सामावलेले असतात. ही कादंबरी अर्थात अनेक अभागी-सत्त्वशून्य जगण्याऱ्यांचा आवाज होऊ लागते. ही कादंबरी दलित अनुभवविश्वापासून मूळ धरू लागते आणि वाढत वाढत समग्र मानवी जीवनाचा दुःखावकाश आपल्या कवेत घेण्याचा यशस्वी प्रयत्न करते. ह्या कादंबरीत चारएक पिढ्यांचे कथाबीज एकत्रित गोवून तयार केलेल्या कथासूत्राला लेखकाने कुठेही वाचाळ स्वरूप येऊ दिले नाही. जागोजागी उपहास आणि विडंबनाचा पुरेपूर वापर करतानाच निर्माण होणाऱ्या उपरोधिक विनोदातून कादंबरी वाचकांना वरवर हसवत आतून कादंबरीचा मजकूर अत्यंत गांभीर्याने घेण्यास भाग पाडते. एकुणात कुसुम नावाच्या तरुण

मुलीची करुण कथा कादंबरीतून उभारताना समाजातील अनेक स्तरांत वावरणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या शोषणाला, अन्यायाला उलगडत नेत जगण्यातील अर्थपूर्णतेच्या खऱ्या दिशा नेमक्या कोणत्या आहेत हे सुचवू पाहाणारी कादंबरी म्हणून देवनूर महादेव यांच्या *कुसुमबाला* या कादंबरीचे स्थान एकूण समकालीन भारतीय साहित्यात महत्त्वपूर्ण ठरणारी आहे.

जातिव्यवस्थेच्या हितसंबंधातून माणसामाणसांमधील मूलभूत संबंधानाच कसे धक्के लागताहेत, जातिव्यवस्थेला तगवण्यात कित्येक पिढ्यांमधील मंडळी आपल्या स्वतःलाच कसे पणाला लावताहेत, माणसांच्या अनेक कृती ह्या जात जिवंत ठेवण्यासाठी आणि ते करताना माणसांच्या अनेक उर्मी आणि कृती किती क्रूरपणे नियंत्रित होत आहेत ह्या लक्षणीय आशयसूत्रांभोवती *कुसुमबाला* फिरत असताना मूख्य आशयसूत्रांभोवती अनेक आशयांचे गुंडाळे सापडत राहतात. ज्यातून जगण्यातील मूलभूततेचा शोध लागत जातो आणि कादंबरी माणसाच्या दुःखाची तीव्रता कमी करण्याचे मार्ग सुचवत राहते. त्यांची कादंबरी दलितत्त्वापासून सुरू होते. दलित जीवनव्यवहारातील अन्यायी जागांना अधोरेखित करत करत ती एकूण व्यवस्थांमधील, नातेसंबंधांमधील, चित्रित प्रदेशातल्या समग्र मानवीजीवनव्यवहारातील शोषणाच्या आणि अन्यायाच्या जागा उघडी पाडत जाते. त्यांचे लिहिणे दलित-पददलितांचे लेखन होता होता समग्र समाजातीलच दुःखव्यवहाराची करुण कहाणी बनायला लागते. त्याचा प्रवास केवळ दुःखदर्शन इतक्यापुरताच राहत नाही. तर हतबलता ओलांडत जगण्यातील मूलभूतता सुचविण्याचाही त्यांचा एक सततचा प्रयत्न राहतो. परिणामी जातिव्यवस्थेपासून लेखनाला सुरुवात करून जातिव्यवस्थांपलीकडे जाऊन माणसाच्या उत्थानाचे मार्ग शोधणारा एक महत्त्वपूर्ण लेखक म्हणून देवनूर समग्र भारतीय लेखकांमध्ये ठळक ठरतो.

देवनूर यांनी केलेल्या समूहकेंद्री चित्रणाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे वर नोंदविल्याप्रमाणे त्यांनी ठरवून दलित जीवनातील वेदना, दुःख वेचून लिहिण्याचा प्रयत्न केला नाही. दलित चित्रण करतानाही संपूर्ण खेडे केंद्रस्थानी ठेवले. यातून जे चित्रण उभे राहू लागले त्यातून मग आपसूकच संपूर्ण गावाच्या पार्श्वभूमीवर येणारे पददलितांचे जीवनव्यवहार आणि त्यातील दुःख, दैन्यावस्था, नव्या शिक्षणाने निर्माण केलेली अस्मिता इ. गोष्टी अधिक परिणामकारक आणि नेमकेपणाने चित्रित होऊ लागले. अर्थात अन्यत्र लिहिल्या गेलेल्या बहुतांश दलित कादंबरीहून देवनूरू जे लिहिताहेत ते अधिक अर्थपूर्णतेच्या दिशेने जाणारे आणि कादंबरीपण सिद्ध करत व्यापक होत जाणारे ठरले. अर्थात देवनूर हे भारतीय खेड्याचा अवकाश आणि भाषा आपल्या लेखनातून जिवंत करतात. जो अनेक सांस्कृतिक आणि सामाजिक संदर्भाने समग्र भारतातील अनेक खेड्यांचे प्रतिनिधित्व करतो असे म्हणता येईल. त्यांच्या कादंबरीत येणारे गाव हे केवळ म्हैसूरच्या भागातील कोणते तरी एक गाव नाही. तर ते भारतातील कोणतेही गाव असू शकते. त्यांच्या साहित्यकृतीचे हेच यश आहे की, त्यांनी चित्रित केलेला काळावकाश भारतातील कोणत्याही प्रदेशातील काळावकाशाला छेदत रहातो. कोणत्याही विशिष्ट काळातील त्या गावाची गोष्ट देवनूर विकसित करतात असे नाही तर त्यांनी ज्या पद्धतीचा काळ कादंबरीत विकसित केला तो काळ भारतातील कोणताही काळ असू शकतो. त्यांच्या साहित्यातील प्रदेश, चित्रित पात्र आणि त्यांच्या संदर्भातील अनेक गोष्टी ह्या भारतभरातील अन्य कोणत्याही ग्रामीण अवकाशाला लावून पाहता येते. ही गोष्ट एका अर्थाने देवनूर यांचे लेखकीय सामर्थ्य म्हणून नोंदवावे लागेल.

४

देवनूर यांच्या लेखनातील बहुतांश मूळं ही लोकव्यवहार आणि त्यातील चलनवलनात मुरलेली आहेत. तेथूनच देवनूर लेखनासाठी पोषणद्रव्य घेतात. (आपल्या लेखनातून आधुनिकतेचा अवकाश उलगडत असताना त्यांनी लोकपरंपरा सरसकट

नाकारलेली नाही आहे. त्यातील बरेकाही वेचताना आत्यंतिक चिकित्सेने लोकपरंपरेला भिडणे हा त्यांचा लेखनस्वभाव राहिलेला आहे.) लोकव्यवहारातील ज्या अनेक गोष्टी आपल्या कादंबरीसाठी त्यांनी वापरलेल्या आहेत त्यापैकी लोकभाषेत वावरणाऱ्या मिथकांचा उल्लेख नक्कीच करता येईल. जनव्यवहारातील अनेक मिथकांना देवनूर आपल्या कादंबरीच्या कथासूत्रात अलगद मिसळवून टाकतात. आपल्या सांगण्याची विश्वसनीयता एकीकडे वाढवत दुसरीकडे मिथकांच्या वापरातून निर्माण होणारा व्यापक अवकाश कादंबरीत मुरवत राहतात. वर्तमानवास्तव प्रखरपणे उलगडण्यासाठी ते हे सगळे एक टूल म्हणून वापरतात. परिणामी कादंबरीत ते रचू पाहत असलेली कथासूत्रे एकीकडे सूक्ष्म होऊ लागतात तर दुसरीकडे आशयसूत्रांचा परीघ विस्तारू लागतो. त्यामुळे देवनूर आपल्या कादंबरीतून जे सांगू, सुचवू पाहतात त्याला खोली प्राप्त होऊ लागते. अशा अर्थाच्या लेखनप्रक्रियेतून देवनूर यांचे लिहिणेच मुळी चांगल्या अर्थाने मिथकाप्रमाणे होऊन गेलेले आहे. अर्थात लिहिण्याची एक स्वतंत्र वाट त्यांनी विकसित केली आणि ती वाटच मुळी एका मिथकाप्रमाणे वावरत आहे.

ह्या कादंबरीत गावातील वेगवेगळ्या जातीवर्गातील घरांमधील देवघरातल्या दिवल्या – ज्योतम्मा ह्या रात्री पारावर एकत्र येत गुजगोष्टी करताहेत असा संदर्भ येत राहतो. घडलेल्या घटना सांगणे आणि त्याच्या विश्वसनीयतेसाठी देवनूर ह्या जोतम्मांचा वापर करतात. आणि पुढे पुढे त्याच कादंबरीची सूत्रं हलवत राहतात. त्याच भाष्यकार होतात. कादंबरीतील त्यांचे चित्रण हे आदिमायेसारखे येत राहते. ज्योतम्मांच्या आधारे कथासूत्रात देवनूर यांना काळाच्या अनेक तुकड्यांना एकमेकात मिसळवता आलेले आहे. विशिष्ट कथासूत्रांच्या आधारे कालानुक्रमे कादंबरी पुढे न जाता अनेक ज्योतम्मांच्या एकत्रित येण्यातून आणि त्यांच्या संवादातून अनेकांच्या कथा एकाच कादंबरीत समान काळात मार्गक्रमण करतात. यातून घटना-प्रसंगांचे जथ्येच्या जथ्येचे एकसलग समांतर प्रवासी होऊ लागतात. परिणामी एका छोटेखानी कादंबरीत चारेक पिढ्यांची अत्यंत रूपकात्मक स्वरूपाची मांडणी करण्यात देवनूर यशस्वी झालेले आहेत.

कादंबरीतील सवर्ण कुसुमचा दलित प्रियकर चन्ना याचा खून झालेला आहे. चन्नाच्या खुनानंतर अनेक अफवा पसरलेल्या असतात. तो जात आणि नाव बदलून अन्यत्र राहतो. तो मुंबईत राहतो अशी देखील अफवा असते. या सगळ्यांचे कादंबरीतील चित्रण विदारक स्वरूपाने येते. शोषणाचे स्तरही ह्यातून स्पष्ट होतात. चन्नाचे हताशा आईबाप चन्नाला भेटायला जाण्याबाबत विचार करताना मुंबईबद्दलचा संवाद कादंबरीत येतो. मुंबई ही भारतीय जनमानसात एका मिथकासारखी वावरत असते. जो तो आपआपल्या पद्धतीने त्याला वाढवत असतो. ह्या कादंबरीतील मृत नायकाचा बाप त्याच्या बायकोला मुंबईबद्दल मिळविलेली जी माहिती सांगतो ती वाचू लागलो तर ती वर्णने मुंबईला खूप अलगद आणि सहजी लागू होतात. (एकदा प्रस्तुत निबंध लिहिणाऱ्याने देवनूर यांना विचारलेले होते की, तुम्ही केलेले मुंबईचे वर्णन मुंबई पाहून केली आहे की, मुंबईबद्दल ऐकून. तर देवनूर यांनी सांगितले होते की, 'मुंबईबद्दल लहानपणापासून ऐकत आलेली गोष्ट होती ती. कादंबरी लिहूपर्यंत आणि कादंबरी प्रकाशित झाल्यानंतर देखील कित्येक वर्षे मी मुंबई पाहिलेली नव्हती.') अशा अर्थाने अनेक समजातून समाज वावरत असतो, त्या अनेकांचा वापर करून कादंबरीकार आपली कादंबरी रचत वर्तमान उलगडत राहतो.

५

*कुसुमबाला* ही कादंबरी म्हैसूर जिल्ह्यातील दक्षिण भागातील नंजनगुड नावाच्या तालुक्याच्या ठिकाणच्या परिसरातील खेड्यापाड्यांमध्ये बोलल्या जाणाऱ्या छोट्या अवकाशातील बोलीतून लिहिली गेलेली आहे. मात्र कादंबरीत उपयोजिलेली भाषा

ही केवळ त्याप्रदेशाने दिलेली भाषा म्हणून वापरली गेलेली नाही. ती इतक्या कल्पकतेने घडवून वापरली गेलेली आहे की, प्रस्तुत कादंबरीची भाषा हीच मुळात कादंबरीच्या आशयाचा भाग झालेली आहे. कादंबरीची भाषा ही कादंबरीच्या आशयात परावर्तित होणे हे कादंबरीकाराचे सगळ्यात मोठे यश आहे. आपल्या कादंबरीतील भाषायोजनेबाबत सांगताना देवनूर म्हणतात की, ''नवव्या शतकातील थोर कन्नड कवी पंपा हा ज्या पुळीगेरी गावात राहायचा. तिथली बोलीभाषा तो कन्नडच्या कर्नलसारखा वापरायचा. त्या बोलीभाषेच्या भट्टीतून शब्द आणि शब्दांश वेचत पंपा आपल्या कवितेची भाषा रचतो. त्याप्रमाणे मी माझ्या नंजनगुड येथील बोलीभाषेला माझ्या लिखाणाचा कर्नल केले. आज भाषा ही कपड्यांसारखी वापरली जाते. पण ती स्वतःच्या त्वचेसारखी असली पाहिजे. निव्वळ त्वचेसारखी पृष्ठस्तरीय नाही तर ती त्वचेच्या अंर्तबाह्य जाणिवेसह वापरली गेली पाहिजे.'' वरील अवतरणातून कादंबरीच्या भाषेकडे देवनूर किती व्यापक आणि किती सूक्ष्म स्वरूपाने पाहतात याचा एक अंदाज येतो.

*कुसुमबाला* ही कादंबरी अनेकदा संवादाच्या माध्यमातून पुढे जाते त्यामुळे अनेक पात्रांच्या अनेकविध तऱ्हा कादंबरीत अपसूकच डोकावतात. यातून कादंबरीतील खूपसा भाग हा दोन आणि त्याहून अधिक लोकांच्या एकत्रित आल्यानंतर होणाऱ्या संवादाने व्यापलेला आहे. किंबहुना त्याच आधारे कादंबरी पुढे पुढे जाते. परिणामी कादंबरीतून अनेकजण आपल्या विशिष्ट भाषेच्या लयीप्रमाणे, धारणेप्रमाणे, कुवतीप्रमाणे, आपल्या समजाप्रमाणे, स्वभावाप्रमाणे सरळसरळ डोकावत राहतात आणि कादंबरी यातून विविध अंगाने वाढत समाजव्यवहारातील अनेकांचा आवाज होऊ लागते. यातून एल. बसवराजू म्हणतात त्याप्रमाणे, 'सामान्य अर्थाने ती (*कुसुमबाला*) कथा न होता, दीर्घकथा न होता, शेवटी कादंबरीलेखन न होता आणि पात्रे देखील वाचाळ न ठरता स्वगतलहरींप्रमाणे रमून जाऊन, आंतरिक वर्तमान स्थितीच प्रतिबिंबित केल्यामुळे ते एक नाटकदेखील न होता–खेळणाऱ्या श्वासोच्छावासासारखे सहजगत्या सोप्यारीतीने बोलीभाषेतील उत्तम कवितांची मिरवणूक होऊन एक काव्य–महाकाव्य होऊन जाते.'

६

देवनूर यांच्या समकाळात कन्नडमध्ये प्रचलित असलेल्या विविध लेखनतऱ्हांशी तुलना करता त्यांचे लेखन हे पूर्णतः स्वंतत्र वळणाचे मानले जाते. देवनूर आपल्या लेखनासाठी वापरत असलेल्या गद्याचे स्वरूप हे केवळ गद्य न राहता छंदोबद्ध पद्यात रूपांतरीत होत राहते. यातून त्यांच्या लेखनाचे स्वरूप गद्यपद्यमिश्रित होते. अशा अर्थाच्या लेखनाची परंपरा त्यांनी लोकव्यवहार आणि कन्नड लेखनपरंपरेकडून स्वीकारलेली आहे. पुन्हा अशा स्वरूपाच्या स्वीकारलेल्या गोष्टीला देवनूर आपल्या लेखकीय क्षमतेने समकालीन करतात. त्यांच्या लेखनातील गद्याचे स्वरूप हे केवळ *दिलेली/घेतलेली* अशी न राहाता ती *घडवलेली* अशा अर्थाची बनायला लागते. परंपरेतील कथनाला मुरवून समकाळाशी नाते सांगणारी नवी कथनपद्धती त्यांनी आपल्या लेखनातून विकसित केलेली आहे. त्याचा एक ध्रुव प्राचीन कन्नड परंपरेत तर दुसरा समकालीन वर्तमानात आहे. त्यात पुन्हा देवनूर यांच्या कादंबरीत परिसरनिष्ठ संस्कृतीव्यवहार, परंपरांचे कादंबरीच्या कथासूत्रातले मिसळणे ह्या सर्व बाबी पाहिल्या की, त्यांचे लेखन अन्य कोणत्या भाषेत अनुवादित करणे म्हणजे किती कठीण गोष्ट आहे याचा एक अंदाज बांधता येईल. पुन्हा जातनिष्ठ, धर्मनिष्ठ संस्कृतीव्यवहार, परंपराव्यवहार हे बदलत असतात. दक्षिण कर्नाटक, त्यातून पुन्हा दलित, गौडा, लिंगायत अशा विविध जात आणि धर्म व्यापलेले एकाच वर्तुळातील संस्कृतीव्यवहाराचे पुन्हा स्वतंत्र–स्वतंत्र वर्तुळ हे अनुवादातून कसे

उतरावयाचे याचे तर मोठेच आव्हान उभे राहते. परंपरेतील अनेक मिथकांचा, रूढींचा, रूपक-प्रतिमा-प्रतीकांचा, वाक्यप्रचार-म्हणी यांचा इतका बेमालूम पण तितकेच अर्थपूर्ण मिश्रण देवनूर यांच्या संहितेमध्ये असते. खरेतर लेखक ज्या भाषा/बोलीचा वापर लेखनासाठी करत असतो त्यालाच मुळात उपरोक्त गोष्टी लगडलेल्या असतात. त्या अन्य भाषा अथवा बोलीत उतवरताना तारांबळ उडणे स्वाभाविक आहे. त्यातही पुन्हा अनुवादासाठी अवघड ठरणाऱ्या अनेक गोष्टींचा पुरेपूर समावेश देवनूर यांच्या लेखनात सापडतो.

**डॉ. गजानन अपिने**
**मराठी विभाग**






Image Courtesy: Google Images

## UPCOMING EVENTS

# November 2019

| Sun | Mo | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 ***Pandit Nehru Jayanti*** | 15 ***Birsa Munda Jayanti*** | 16 |
| 17 | 18 | 19 ***Indira Gandhi Jayanti and Rashtriya Ekatmata Din*** | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 ***Samvidhan Din*** | 27 | 28 | 29 | 30 |




*Image Courtesy: Google Images*

*All images in this Bulletin Issue are downloaded from Google Images.*

*Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Article*